[2023] 3 एस.सी.आर.

आयकर आयुक्त - ७ ...अपीलकर्ता (कर्ते )

वि रुद्ध

मेसर्स. पाव्हीले प्रोजेक्टस प्रायव्हेट लिमिटेड ....उत्तर वादी

( दिवाणी अपील क्रमांक ६१२६/२०२१ )

०६ एप्रिल २०२३

[एम. आर. शहा आणि ए. एस. बोपण्णा न्या. न्या ]

प्राप्तिकर अधिनियम, १९६१ - कलम २६३ - अधिकारक्षेत्राचा वापर – प्रतिवादीने आर्थिक वर्ष २००७-०८ मूल्यनिर्धारणासाठी आयकर विवरणपत्र दाखल केले, ज्यात त्याने ३३ कोटी रुपयांच्या रकमेसाठी मालमत्ता / इमारतीची विक्री दर्शविली - करदात्याच्या म्हणण्यानुसार, मालमत्ता हि बोजा - मुक्त होण्याच्या उद्देशाने विकली गेली आणि विक्रीतून मिळणारे पैसे भागधारकांना परतफेड करण्यासाठी वापरले आणि म्हणूनच, कर्जाची ही रक्कम " सुधारणा खर्च" होती.

- कलाम 143 (3) अन्वये एओ ने मूल्यांकन स्वीकारले - मात्र, आयुक्तांनी आयटी कायद्याच्या कलम २६३ अन्वये अधिकार क्षेत्राचा वापर करून कलम १४३ (३) अन्वये दिलेला मूल्यांकन आदेश चुकीचे आणि महसुलाच्या हिताला बाधा आणणारे आहे असा निर्णय दिला. – आयुक्तांनी एओने दिलेला मूल्यांकन आदेश रद्द केला - आयटीएटीने असा निष्कर्ष काढला की

आयुक्तांनी आयटी कायद्याच्या कलम 263 अन्वये चुकीच्या पद्धतीने अधिकारक्षेत्राचा वापर केला आणि करदात्याच्या दाव्याची स्वीकारार्हता कायम ठेवली - आयटीएटीच्या आदेशाविरुद्धचे अपील उच्च न्यायालयाने फेटाळले - अपीलावर, पुढीलप्रमाणे निर्णय देण्यात आला : मलबार इंडस्ट्रियल कंपनी लिमिटेडच्या बाबतीत घालून दिलेला कायदा लागू करणे आणि मूल्यांकन आदेश तसेच प्राप्तिकर आयुक्तांनी दिलेला आदेश पाहिल्यानंतर न्यायालयाचे मत आहे की मूल्यांकन आदेश केवळ चुकीचेच नाही तर महसुलाच्या हितासाठी हानिकारक सुद्धा आहेत तसेच - प्रकरणातील वस्तुस्थिती व परिस्थिती पाहता आयुक्तांनी कलम २६३ अन्वये नसलेल्या अधिकार क्षेत्राचा वापर केला असे म्हणता येणार नाही. - उच्च न्यायालयाने केली गंभीर चूक - उच्च न्यायालयाने दिलेला निकाल आणि आदेश रद्द बातल ठरवला आणि आयुक्तांनी दिलेला आदेश कलम २६३ अन्वये अधिकारांचा वापर करून देण्यात आला होता हे तत्व पुनर्रस्थापित केले गेले.

अपील मंजूर करत न्यायालयाने खालील प्रमाणे आपले मत मांडले**:**

हे तत्व खरे आहे कि मलबार इंडस्ट्रियल कंपनी लिमिटेडमध्ये प्राप्तिकर कायद्याच्या कलम २६३ चा अर्थ लावताना आणि निर्णय देताना असे म्हटले आहे की, या कलमांतर्गत अधिकार क्षेत्राचा वापर करण्यासाठी प्राप्तिकर कायद्याच्या २६३(१) नुसार आयुक्तांना पुढील दुहेरी अटी, म्हणजे, (१) मूल्यमापन अधिकाऱ्याचा आदेश सुधारित करणे चुकीचे आहे; आणि (२) हे महसुलाच्या दृष्टीने अपायकारक आहे. पुढे असे दिसून आले आहे की जर त्यापैकी एक तत्व जरी तेथे नसेल तरी कलम 263 (1) चा आधार घेता येणार नाही. [परिच्छेद ७.१][३१८-ई-एफ]

२. मलबार इंडस्ट्रियल कंपनी लि. च्या बाबतीत पाहिल्याप्रमाणे कायद्याची योजना कर आकारणे आणि गोळा करणे आहे आणि कायद्यातील तरतुदींनुसार हे काम महसूल खात्याकडे सोपवले जाते. प्राप्तिकर अधिकाऱ्याच्या चुकीच्या आदेशामुळे एखाद्या व्यक्तीने कायदेशीररित्या देय असलेला कर गमवावा लागत असल्याचे निदर्शनास आले तर ते निश्चितच महसूल खात्याच्या हितसंबंधांना हानिकारक ठरेल तथापि, केवळ अशा प्रकरणात जिथे दोन मते आहेत शक्य आहेत आणि मूल्यमापन अधिकाऱ्याने त्यातील एक दृष्टीकोन स्वीकारला आहे, आणि मग असा निर्णय, जो प्रशंसनीय असू शकतो, आणि त्याचा परिणाम म्हणून महसुलात तोटा झाला आहे, , असा आदेश कलम २६३ अन्वये सुधारित करता येत नाही [पॅरा ७.२][३२०-ए-सी]

३. मूल्यमापन आदेश व प्राप्तिकर आयुक्तांनी दिलेला आदेश, याचा जर अभ्यास केला तर मूल्यांकनाचा आदेश केवळ चुकीचाच नाही तर महसुलाच्या हितालाही घातक आहे, असे आमचे सुद्धा मत आहे. या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती पाहता असे म्हणता येणार नाही की, आयुक्तांनी कलम २६३ अन्वये अधिकार नसताना संबंधित अधिकारक्षेत्राचा वापर केला. [परिच्छेद ७.३] [320-डी-ई]

मलबार इंडस्ट्रियल कंपनी लिमिटेड विरुद्ध सीआयटी (२०००) २ एससीसी ७१८ : [२०००] १ एससीआर ७४४ : (२०००) २४३ आयटीआर ८३ (एससी) – यावर अवलंबून

सीआयटी विरुद्ध श्रीमती शकुंतला कांतीलाल (१९९१) १९० आयटीआर ५६ (मुंबई); केमोसिन लिमिटेड विरुद्ध एसीआयटी (२०१२) (25) टॅक्समन.कॉम ३२५ (मुंबई) - याचा संदर्भ.

## केस लॉ संदर्भ

[२०००] १ एससीआर ७४४ पारस ३.४, ७.२, ७.३ यावर अवलंबून दिवाणी अपील अधिकारक्षेत्र: दिवाणी अपील क्रमांक ६१२६ / २०२१ उच्च न्यायालयाच्या दिनांक १८/९/२०१७ च्या निर्णय व आदेशावरून आय टी ए क्रमांक ७८ / २०१५.

बलबीर सिंह, ए एस जी, पीयूष बेरीवाल, चिन्मयी चंद्रा, श्याम गोपाल, श्याम, मनीष, राज बहादूर यादव, . . . अपिलार्थींचे अधिवक्ता म्हणून
फिरोज अंध्यारुजिना, वरिष्ठ अधिवक्ता , मानेक अंध्यारूजिना, नीरव बी. मर्चंट, राजेश कुमार, विनोद कुमार, उत्तरवादींसाठीच अधिवक्ता म्हणून

न्यायालयाचा निर्णय यांच्याद्वारे देण्यात आला

**एम. आर. शहा, न्या.**

१. मंबुई उच्च न्यायालय अधिकारिता यांनी महसूल विभागाने दाखल केलेले अपील आयटीए क्र. ७८/२०१५, मध्येदि नांक १८.०९.२०१७ रोजी आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश दिला आणि त्याद्वारे त्यांचे अपील फेटाळून लावले, त्यामुळे व्यथित आणि नाराज होऊन, महसूल विभागाने प्रस्तुतचे अपील दाखल केलेले आहे.

२. प्रस्तुतचे अपिलाशी संबंधित करनिर्धारण आदेश हा करनिर्धारण वर्ष २००७ - २००८ चा आहे.

३. उत्तरवादी म्हणजे करपात्र कंपनी ही कपडे, बूट इत्यादीचं उत्पादन आणि निर्यात करण्याच्या व्यवसायात गंतुलेली होती. तिने करनिर्धा रण वर्ष २००७-२००८ साठी ति चे आयकर विवरण भरले होते, ज्यामध्ये रुपये ३३ कोटी रकमेची मालमत्ता/इमारत "पाव्हीले हाऊस" ची विक्री दर्शविली होती. म्हणजे करपात्र कंपनीने "पाव्हीले हाऊस" ही इमारत सन १९७२ मध्ये खरेदी

केलेल्या जमिनीच्या तुकड्यावर बांधली होती. कंपनीचे सदर घर हे कंपनीच्या ताळेबंदात योग्यरीत्या प्रतिबिंबित झाले होते.

३.१ असे दि सून यते की, कंपनीचे भागधारक हे कुटुंबातील सदस्य असल्याने त्यांच्यामध्ये खटला चालू होता. कंपनी कायदा मंडळ आणि उच्च न्यायालयातील खटले लवादापुढे दाखल करण्यात आले होते. लवादाच्या कार्यवाहीमध्ये, अंतरिम निवाडा देण्यात आला होता, ज्याद्वारे पक्षकारांमध्ये "कौटुंबिक समझोता" म्हणून संबोधण्यात आलेला एक सलोख्याचा समझोता नोदंविला गेला होता आणि अंतरिम निवाड्यानुसार,तीन भागधारक नामे, (१) आशा, (२) नंदिता आणि (३) निखि ल, यांना प्रत्येकी रुपये १०.३५ कोटी देण्यात आले होते. करपात्र कंपनीच्या म्हणण्यानुसार, " पाव्हीले हाऊस " ची विक्री ही बोजा फेडण्यासाठी म्हणजे विक्री रकमेतून भागधारकांची देणी फेडण्यासाठी करण्यात आली होती आणि म्हणून सदर बोजा फेडणे ही " सुधारणेची किंमत " होती. यात वर नमूद केल्याप्रमाणे, " पाव्हीले हाऊस " रक्कम रुपये ३३ कोटीनं विकले होते. करपात्र कंपनीने, त्यापासून मिळालेला नफा रक्कम रुपये १,२१,१६,६९५/- इतका हा करनिर्ध रण वर्ष २००७-०८ साठी ति च्या उत्पन्नाच्या गणनेत " दिर्घकालीन भांडवली नफा " म्हणून दर्शविला होता. भांडवली नफ्याची कार्यरत गणना कर निर्धारण अधिकारी यांनी स्वीकारली होती, ज्याद्वारे बोजा काढून टाकण्याच्या खर्चाचा दावा (अंतरिम निवाड्यानुसार, तीन भागधारकांना दिलेले रुपये १०.३३ कोटी ) हा " सुधारणेचा खर्च " म्हणून घेतला गेला होता आणि भांडवली नफ्याच्या गणनेवरील बोजा

दूर करण्यासाठी वजावटीचा दावा केला होता. शिल्लक रकमेवर भांडवली नफा कर देऊ केला होता आणि तो भरण्यात आला होता. करनिर्धारण अधिकारी यांनी, उत्पन्नाच्या गणनेत जोडलेल्या पत्रकाप्रमाणे " दिर्घकालीन भांडवली नफा " स्विकारून दि नांक १५.१२.१९ रोजी आयकर अधिनियमाच्या(थोडक्यात "आयकर अधिनियम") कलम १४३(३) नुसार कर निर्धारण पूर्ण केले होते.

३.२ तथापि , आयकर आयुक्त -७ यांनी आयकर अधि नि यमाच्या कलम २६३ अन्वये दिनांक २४.१०.२०११ ची नोटीस ही आयकर अधिनियमाच्या कलम २६३ च्या अंतर्गत करनिर्धारण आदेश रद्द का केला जाऊ नये याचेकारण दाखवण्यासाठी जारी केली होती. आयुक्तांनी, दिनांक २४.११.२०११ च्या कर निर्धा रण आदेशाद्वारे असा निर्णय दिला की, दि र्घकालीन भांडवली नफ्याची गणना करताना सुधारणेची किंमत म्हणून करपात्र कंपनीने दावा केलेली रक्कम रुपये ३१.०५ कोटीच्या वजावटीशी संबंधि त मुद्द्यांवर, आयकर अधिनियमाच्या कलम १४३(३) अन्वयेदिलेला करनिर्धारण आदेश हा चुकीचा आणि महसूल विभागाच्या हि तास बाधा आणणारा होता. करपात्र कंपनीचा दावा असा आहे की, सदरचा भरणा हा तिच्याकडून खटल्याच्या समझोत्यापोटी करण्यात आला होता, जो ति च्या म्हणण्यानुसार बोजा फेडण्यासाठी होता आणि तो सुधारणेचा खर्च म्हणून विचारात घेणे आवश्यक होते, जो आयुक्तांनी स्वीकारला नव्हता. कारण त्यांच्या म्हणण्यानुसार, तो आयकर अधिनियमाच्या कलम ५५(१) (ब) मध्ये समाविष्ट असलेल्या "सुधारणेचा खर्च " या व्याख्येत येत नाही. आयुक्तांच्या म्हणण्यानुसार,

करपात्र कंपनीने दावा केलेला खर्च हा भांडवली स्वरूपाचा खर्च नव्हता किंवा भांडवली मालमत्तेला स्थायी स्वरूपाचेवर्धि त मूल्य प्रदान करणारेकोणतेही भर किंवा बदल नव्हते. आयुक्तांनी असाही निर्णय दिला की, भरणा हा म्हटल्याप्रमाणे, करपात्र कंपनीने बोजा काढून टाकण्यासाठी केलेला नव्हता.

३.३. आयुक्तांनी असाही निर्णय दिला की, आयकर अधिनियमाच्या कलम ५० (अ) आणि ५५(१) ( ब) च्या तरतुदींचे पालन केले गेले नव्हते आणि आयकर अधिनियम यांच्या तरतुदींशी सुसंगत असा कर निर्धारण आदेश तयार केला गेला नव्हता आणि म्हणून करनिर्धारण आदेश हा चुकीचा आणि महसुलाच्या हितास बाधा आणणारा होता. परि णामी, आयुक्तांनी, करनिर्धारण अधिकारी यांनी दिलेला आदेश रद्द केला आणि आदेशात चर्चा केल्याप्रमाणे, कर नि र्धा रण अधिकारी यांना आयकर अधिनियम च्या तरतुदीही सुसंगत अशी कर पात्र कंपनीच्या भांडवली नफ्याची पनुर्गणना करण्यासाठी निर्देश दि ले.

३.४ करपात्र कंपनीने, आयुक्तांनी, आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गत पारित केलेल्या आदेशावि रुद्ध ,आय टी ए क्र. १६/ एम युएम /२०१२, आयकर अपिलीय न्यायाधि करणाकडे (थोडक्यात "आयकर अपिलीय न्यायाधिकरण") दाखल केले होते. आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने मलबार इंडस्ट्रियल इस्टेट कंपनी लिमिटेड वि रुद्ध सी आय टी (२०००) २ एस सी सी ७१८ (२०००) २४३ आय टी आर ८३ ( एस सी ), या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयावर विसंबून असा निष्कर्ष काढला की, आयुक्तांनी, आयकर अधिनियम च्या कलम

२६३ अंतर्गत अधिकारक्षेत्राचा चुकीचा वापर केला होता. आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने असे निरीक्षण केले की, सांगितलेल्या त्यामध्ये कोणतीही त्रुटी नव्हती. आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने असा निर्णय दि ला की, जेव्हा दोन दृष्टिकोन शक्य होते आणि करनिर्धारण अधिकारी यांनी एक दृष्टि कोन घेतला, ज्याच्याशी आयकर आयुक्त सहमत नव्हते त्यावेळी करनिर्धारण अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचा परिणाम म्हणून महसुलाचे प्रत्येक नुकसान हे महसुलाच्या हितासाठी बाधा आणणारे आहे असे समजले जाऊ शकत नाही. आयकर अपिलीय न्यायाधिकरण ने देखील, सी आय टी विरुद्ध श्रीमती शकुंतला कांतीलाल (१९९१) १९० आयटीआर ५६ (मुंबई ), या प्रकरणात मंबुई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर विसंबून, भागधारकांना दिलेले रकमेच्या वजावटी बाबतची करपात्र कंपनीच्या दाव्याची अनुमतता मान्य केली होती. आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने, न्यायाधिकरण (मुंबई खंडपीठ), यांनी केमोसि न लिमिटेड विरुद्ध ए सी आय टी (२०१२) (२५) टॅक्समॅन डॉट कॉम ३२५ (मुंबई ), या प्रकरणात दिलेल्या आदेशावर विसंबून असा निर्णय दिला की, भागधारकांच्या रकमा देण्यासाठी झालेला खर्च हा वजावटी योग्य नाही, हे आयकर आयुक्तांचे निरीक्षण चुकीचे आहे.

३.५ महसूल विभागाने, आयकर अपिलीय न्यायाधिकरणाच्या आदेशाविरुद्ध केलेले अपील,उच्च न्यायालयाने आक्षेपीत न्यायनि र्णय आणि आदेशाद्वारे फेटाळले आहे, ज्यामध्ये उच्च न्यायालयाने आयकर अपिलीय न्यायाधि करणाचे नि ष्कर्ष कायम केले आहते आणि त्यांनी नोंदवलेल्या निष्कर्षांना सहमती दर्शवून असे म्हटले आहे की, ३१.०५ कोटी रुपयांचा वजावटीचा दावा, हा

खटला समाप्त करण्यासाठी होता आणि खटला तेव्हाच संपला होता जेव्हा इमारत विकली गेली होती आणि कंपनी कायदा मंडळाचे निर्देश आणि अंतरिम लवाद निवाड्यानुसार रक्कम दिली गेली होती, म्हणून कर निर्धारण अधिकारी यांनी परवानगी दिल्यानुसार, ते आयकर अधिनियमाच्या कलम ५५ (१)( ब ) अंतर्गत वजावट करण्यायोग्य होते.

३.६ महसूल विभागाने दाखल केलेले अपील, उच्च न्यायालयाने आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे फेटाळून लावले होते आणि आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने दिलेला आदेश कायम केला होता, ज्याद्वारे आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने आयुक्तांनी, आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गत दिलेला आदेश रद्द केला होता, त्यामुळे व्यथित आणि नाराज होऊन महसूल विभागाने प्रस्तुतचे दाखल केले आहे.

४. महसूल वि भागाच्या वतीने उपस्थित असलेले विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री बलबीर सिंग यांनी जोरदारपणे म्हणणे मांडले की, महसूल विभागाने दाखल केलेले अपील फेटाळण्यात आणि आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने दिलेला आदेश कायम करण्यात उच्च न्यायालयाने अतिशय चूक केली आहे, ज्याद्वारे आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने आयुक्तांनी, आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गत असलेले अधिकार वापरून दिलेला आदेश रद्द केला आहे.

४.१ असे सादर केले आहे की, उच्च न्यायालयाने हे सत्य अजिबात विचारात घेतले नाही की, करनिर्धारण अधिकारी यांनी जमिनीच्या विक्रीतून भांडवली नफ्याची गणना करताना, रुपये

३१.०५ कोटीच्या खर्चा स परवानगी देताना घेतलेला दृष्टि कोन हा चुकीचा आणि कायद्यानुसार नव्हता कारण भागधारकांना दिलेल्या रकमा हा खर्च नव्हता किंवा

विचाराधीन मालमत्तेशी त्याचा कोणताही संबंध नव्हता. पुढे असे सादर केले आहे की, उच्च न्यायालयाने देखील योग्य रीतीने हे विचारात घेतले नाही की, करपात्र कंपनीने केलेला दावा खटल्याच्या निकालाच्या बदल्यात तिने भरलेली रक्कम रुपये ३१.०५ कोटी ही बोजामुक्त होईल आणि म्हणून ती रक्कम सुधारणेची किंमत म्हणून विचारात घेणेआवश्यक आहे, हे कायद्यानुसार चुकीचेआहे. असे सादर केले आहे की, करपात्र कंपनीने भागधारकांना पाच कोटी रुपयेअदा केले म्हणजे करपात्र कंपनीने आधीच अधिग्रहित केलेल्या मालमत्तेवर काही व्याज संपादन केले असे होत नाही. असे सादर केले आहे की, करपात्र कंपनीने मालमत्तेवर आधीच उपभोगलेले अधिकार हे निरपेक्ष होते. करनिर्धारण अधिकारी यांनी दिलेला करनिर्धारण आदेश हा चुकीचा, कायद्याच्या दृष्टीने वाईट आणि महसूल वि भागाच्या हिताला बाधा आणणार होता, जो आयकर अपिलीय न्यायाधिकरणाकडून रद्द केला गेला नसता आणि म्हणून आयुक्तांनी, आयकर अधिनियमाच्या २६३ अन्वये तो योग्यरित्या रद्द केला होता.

४.२ पुढे असे सादर करण्यात आले आले की, आयुक्त यांनी योग्यरीत्या निरीक्षण केले आहे की, करपात्र कंपनी ही मालमत्तेची स्पष्ट मालक होती आणि सदर मालमत्तेची विक्री रोखण्यासाठी कोणताही बोजा नव्हता. तो तीन भागधारक भाऊ आणि दोन बहिणी मध्ये कौटुंबिक वाद होता ज्यात लवादाच्या निवाड्याद्वारे समझोता केला गेला होता आणि तीन भागधारक प्रत्येकी १०.३५

कोटी रुपयांचे समभाग हस्तांतरित करण्यासाठी तसेच कंपनीतील अतिरिक्त समभागांवरील कोणतेही हक्क किंवा दावा सोडण्यासाठी पात्र ठरले होते, ज्याचा मालमत्ता सुधारणेशी काहीही संबंध नव्हता. असे सादर केले आहे की,भागधारकांना फक्त ही काळजी होती की, लवादाच्या निवाड्यानुसार विक्रीतून मिळालेली रक्कम प्रथम त्यांची देणी देण्यासाठी वापरली जावी. असे सादर केले आहे की, म्हणून दोघांनीही म्हणजे, न्यायाधिकरण तसेच उच्च न्यायालय यांनी, रुपये १०.३५ कोटी रकमेचा केलेला भरणा हा वजावट म्हणून ग्राह्य होता, हा नि ष्कर्ष काढण्यात चूक केली आहे.

४.३ असे सादर करण्यात आले आहे की, आयकर अपिलीय न्यायाधिकरण तसेच उच्च न्यायालय या दोघांनीही हे विचारात न घेता की,सध्याच्या खटल्यातील तथ्य ही न्यायनिर्णयावर अवलंबून असलेल्या तथ्यांशी एकरूप नाहीत, केमोसिन लिमिटेड (उपरोल्लेखीत) आणि श्रीमती शकुंतला कांतीलाल (उपरोल्लेखीत), यांच्या प्रकरणांमध्ये नमूद केलेल्या गुणोत्तराच्या आधारे, आयुक्तांचेआदेश रद्द करण्यात चूक केली आहे.

४.४ पुढेअसे सादर केलेआहे की, अन्यथा देखील विक्री केलेल्या मालमत्तेचा काही भाग हा करपात्र कंपनीच्या व्यवसायात वापरला गेला होता आणि म्हणून विक्री केलेल्या मालमत्तेच्या त्या भागावरील भांडवली नफ्यावर, कर आकारणी आयकर अधिनियम कलम ५०( अ) च्या तरतुदीनुसार आवश्यक होते आणि म्हणून आयकर आयुक्त यांचा संपूर्ण आदेश रद्द करता आला नसता. वरील निवेदनेसादर करताना, प्रस्तुतचेअपील मान्य करण्याची वि नंती करण्यात आली

आहे.

५. करपात्र कंपनीच्या वतीने उपस्थि त असलेले विद्वान  वरिष्ठ वकील श्री फिरोज अंध्यारुजीना यांनी प्रस्तुतच्या अपीलास जोरदारपणे विरोध केला आहे.

५.१)  करपात्र कंपनीच्या  वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी आवेशपूर्ण ठाम प्रतिपादन केले आहे की, प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेता, उच्च  न्यायालयाने, आयकर आयुक्तांनी आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गत पुनरीक्षण अधिकारांचा चुकीचा वापर केला आहे असा निर्णय देऊन आयुक्तांनी दिलेला आदेश रद्दबातल करण्यात आणि आयकर अपिलीय न्यायाधिकरणाने दिलेला आदेश कायम ठेवण्यात कोणतीही चूक केलेली नाही.

५.२)  असे सादर केले आहे की, उच्च न्यायालयाने, मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये या न्यायालयाने घालून दिलेल्या कायद्याचा आधार घेऊन विनिर्दिष्टपणे असा निर्णय दिला आहे की अपिलीय न्यायाधिकरणाने करनिर्धारणाचे आदेश आणि आयुक्तांनी दिलेला आदेश यांचा योग्य विचार करून नंतर आयुक्तांनी आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा चुकीच्या पद्धतीने वापर केल्याचा निष्कर्ष काढला आहे.

५.३)  असे सादर केले आहे की, करनिर्धारण अधिकाऱ्याने दिलेला आदेश हा उत्पन्नाबाबतच्या

विवरणपत्राच्या छाननीनंतर दिलेला एक तर्कसंगत आदेश होता तसेच करनिर्धारण अधिकाऱ्याने घेतलेला दृष्टिकोन हा वाजवी होता आणि म्हणून करनिर्धारण आदेश जो आयकर अधिनियमाच्या कलम २६३  अन्वये आयुक्तांनी पुनरिक्षणात विचारात घेणे आवश्यक होते तो चुकीचा आणि महसुलाबाबतच्या हिताला बाधा आणणारा होता असे मानले जाऊ शकत नाही.

५.४)  असे सादर करण्यात आले आहे की करनिर्धारण अधिकाऱ्याने सुधारणा खर्च म्हणून वजावटीचा दावा मान्य करण्याबाबत घेतलेल्या दृष्टिकोनाला श्रीमती शकुंतला कांतीलाल (उपरोल्लेखित) या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार होता.  पुढे असे सादर करण्यात आले की, समभागधारकांच्या दाव्यांची पूर्तता झाल्याशिवाय मालमत्तेच्या संपूर्ण भागाची विक्री होऊ शकली नसती हे लक्षात घेण्यात आयुक्त  अयशस्वी ठरले.  भारीत मालमत्तेची विक्री करून केवळ फायदा मिळवण्यासाठीच पक्षकारांनी लवादाद्वारे समझोता केला. विवाद मिटविला जात आहे, रक्कम प्रदान करण्यात आली आहे, अशा परिस्थितीमध्ये, कर निर्धारण अधिकाऱ्याने सुधारणा खर्च म्हणून वजावटीच्या दाव्याला मान्यता देण्यामध्ये कोणतीही चूक केलेली नाही.

५.५)  करपात्र कंपनीच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी पुढे असे सादर केले आहे की मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित ( उपरोल्लेखित) ह्या प्रकरणामध्ये या न्यायालयाने असा

निर्णय दिला आहे की जर आदेश चुकीचा असेल परंतु तो महसुलाच्या हिताला बाधक नसेल तर आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गत आयुक्त पुनरिक्षण अधिकारीतेचा वापर करू शकत नाहीत. असे सादर केले आहे की, पुढे असे निरीक्षण केले जाते आणि असे मानले जाते की मानले जाते की करनिर्धारण अधिकाऱ्याच्या आदेशाचा परिणाम म्हणून महसुलाचे होणारे प्रत्येक नुकसान हे महसुलाचा हितासाठी बाधक मानले जाऊ शकत नाही. जर करनिर्धारण अधिकाऱ्याने अधिनियमांमध्ये अनुज्ञेय कार्यवाहींपैकी एखादी कार्यवाही अनुसरली आणि त्यामुळे महसुलाचे नुकसान झाले किंवा जेथे दोन दृष्टिकोन शक्य आहेत आणि करनिर्धारण अधिकाऱ्याने त्यापैकी एक दृष्टिकोन स्वीकारला ज्याच्याशी आयकर आयुक्त सहमत नाहीत तर तो महसुलाच्या हितासाठी बाधक असा चुकीचा आदेश असल्याचे मानले जाऊ शकत नाही, असे निरीक्षण नोंदवून तास निर्णय देण्यात आला आहे.

५.६) करपात्र कंपनीच्या वतीने उपस्थित असलेल्या विद्वान वकिलांनी भार याबाबतीत पुढे असे सादर केले आहे की सध्याच्या प्रकरणामध्ये कंपनीच्या भागधारकांमध्ये लवादाची कार्यवाही सुरू होती. यामध्ये सर्व वाद संपले आणि अंतरीम लवाद निवाडा पारित करण्यात आला ज्याद्वारे संपूर्ण प्रकरण सामंजस्याने निकाली काढण्यात आले आणि तो समझोता जो “कौटुंबिक समझोता” होता त्याला अंतरिम निवाड्याचे स्वरूप प्राप्त झाले आणि त्यानंतर, वचन बद्धतेची पूर्तता झाल्यावर त्यास अंतिम स्वरूप प्राप्त झाले. असे सादर केले आहे की प्रस्तुत प्रकरणांमध्ये

भागधारकांना प्रत्येकी १०.३५ कोटी रुपये दिले गेले आहेत. असे सादर केले आहे की कंपनीने सदर रक्कम (i) व्यवसाय आणि त्यातील कामकाज सुरळीत चालण्यासाठी, (ii) भागधारकांमधील वाद संपविण्यासाठी, (iii) कंपनीची मालमत्ता जतन करण्यासाठी, (iv) त्यामध्ये सातत्य आणि सुरक्षितता राहण्यासाठी तसेच भाऊ आणि दोन बहिणी, जे कंपनीचे भागधारक आहेत त्यांच्यामध्ये सौहार्दपूर्ण समझोता राहण्यासाठी आणि (v) मालमत्तेवरील बोजा काढून टाकण्यासाठी प्रदान केली आहे. असे सादर करण्यात आले आहे की, त्यामुळे रकमेचे प्रदान करणे आवश्यक होते आणि ती, उच्च न्यायालयाचे आदेश, लवादाचा निवडा, त्याचप्रमाणे स्वतः भागधारक यांच्या मान्यतेनुसार मान्य आणि मंजूर करण्यात आली आहे. असे सादर केले आहे की, खरे तर , अंतरिम निवाड्यामध्ये एक विशिष्ट कलम होते जे कंपनीला तिच्या दायित्वाची पूर्तता करण्यासाठी मालमत्ता विकण्याचा अधिकार देते. असे सादर केले आहे की, लवादाच्या निवाड्यानुसार, भागधारकाच्या दाव्याची रक्कम प्रदान करणे आवश्यक आहे. हा तो एक भार होता जो न्यायालयाच्या आदेशानुसार आणि लवादाच्या निवाड्यानुसार चुकता करणे आवश्यक आहे. त्यामुळे, बोजा मुक्त होण्यासाठी "पाव्हिल हाऊस" ची विक्री होणे आणि विक्रीच्या रकमेतून भागधारकांचे देणे दिले जाणे आवश्यक होते आणि म्हणून बोजा मुक्त होणे हा भांडवली खर्च होता. असे सादर करण्यात आले की, त्यामुळे, भागधारकांना दिलेली रक्कम, जी बोजा दूर करून टाकण्यासाठी म्हणून दिली अशी योग्य रीतीने धारणा करण्यात आली होती, ती भांडवली लाभाच्या गणनेवरील भार काढून टाकण्याचा दावा केल्याप्रमाणे वजावट होती अशी योग्य रीतीने

धारणा करण्यात आली होती.

५.७) असे सादर केले आहे की, म्हणून, करनिर्धारण अधिकाऱ्याने दिलेला आदेश हा चुकीचा आणि महसुलाबाबतच्या हिताला बाधक असल्याचे कारण देत आयुक्तांनी चुकीच्या पद्धतीने आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गतच्या अधिकारीतेचा वापर केला.

उपरोक्त युक्तिवाद सादर करून आणि मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित ( उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये या न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर भिस्त ठेवून सध्याचे अपील फेटाळण्याचे विनंती केली आहे.

६) युक्तिवाद ऐकला.

७) प्रस्तुत प्रकरणामध्ये, आयुक्तांनी, आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अन्वये असलेल्या अधिकारांचा आणि पुनरिक्षण अधिकारीतेचा वापर करून करनिर्धारण आदेश चुकीचा आणि तसेच महसूल हिताला बाधक असल्याचे विनिर्दिष्ट निरीक्षण नोंदवून सदर करनिर्धारण आदेश रद्द केला. तथापि, उच्च न्यायालयाने, आयुक्तांनी कलम २६३ अन्वये अधिकाराचा चुकीच्या पद्धतीने वापर केल्याचे निरीक्षण नोंदवून, आयुक्तांनी दिलेला आदेश रद्द करण्याचा आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश पारित केला आहे.

७.१) करपात्र कंपनीच्या वतीने उपस्थित विद्वान वकिलांनी या न्यायालयाने मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित (उपरोल्लेखित) या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयावर मोठ्या प्रमाणावर भिस्त ठेवली आहे. हे खरे आहे की उक्त न्यायनिर्णयामध्ये आणि आयकर अधिनियमाच्या कलम २६३ च्या अर्थउकलानुसार असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे आणि असे निर्णीत करण्यात आले आहे की आयकर अधिनियमाच्या कलम २६३(१) अंतर्गत अधिकारीतेचा वापर करण्यासाठी आयुक्तांचे दोन बाबींबद्दल समाधान झालेले असणे आवश्यक आहे, ते म्हणजे (i) कर निर्धारण अधिकाऱ्याचा आदेश ज्याचे पुनरीक्षण करण्याची विनंती केलेली आहे तो आदेश चुकीचा आहे आणि ( ii) तो महसुलाच्या हितासाठी बाधक आहे. पुढे असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे की जर त्यापैकी एक जरी बाब नसेल तर सदर अधिनियमातील कलम २६३(१) चा वापर करता येणार नाही. "महसुलाच्या हितासाठी काय बाधक आहे असे म्हणता येईल" याबाबत मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित (उपरोल्लेखित) या प्रकरणातील न्यायनिर्णयाच्या परिच्छेद क्रमांक आठ आणि दहा मध्ये चर्चा केली आहे ती खालील प्रमाणे:

// "८. "महसुलाच्या हितासाठी बाधक" हा वाक्प्रचार ही कलेची अभिव्यक्ती नाही आणि अधिनियमामध्ये त्याची व्याख्या केलेली नाही. त्याच्या सामान्य अर्थामधून हे समजले आहे की त्या वाक्प्रचाराला विस्तृत अर्थ आहे आणि तो फक्त कराराच्या नुकसानी पुरता मर्यादित नाही.

कलकत्ता उच्च न्यायालयाने दावजी दादाभॉय आणि कंपनी विरुद्ध एस्. पी. जैन [(१९५७) ३१ आय टी आर ८७२ ( कलकत्ता)] ह्या प्रकरणामध्ये; कर्नाटक उच्च न्यायालयाने सी.आय टी. विरुद्ध टी. नारायण पै [(१९७५) ९८ आय. टी. आर. ४२२ (कर्नाटक)] ह्या प्रकरणामध्ये; मुंबई उच्च न्यायालयाने सी.आय. टी. विरुद्ध ग्रॅब्रिएल इंडिया लिमिटेड [(१९९३) २०३ आय. टी. आर. १०८ (बॉम्बे)] ह्या प्रकरणामध्ये आणि गुजरात उच्च न्यायालयाने सी. आय.टी. विरुद्ध मीनलबेन एस्. पारिख [(१९९५) २१५ आय.टी.आर. ८१ (गुजरात)] ह्या प्रकरणामध्ये दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये करामध्ये झालेल्या नुकसानीला महसूल हितसंबंधांना बाधक ठरविले आहे.

९. श्री अब्राहम यांनी "महसुलाच्या हितासाठी बाधक" ह्या वाक्प्रचाराची अर्थउकल करणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या वेंकटकृष्ण राईस कंपनी विरुद्ध सी.आय.टी [(१९८७) १६३ आय.टी.आर. १२९ (मद्रास)] या प्रकरणांमध्ये पारित केलेल्या निर्णयावर भिस्त ठेवली आहे. सदर न्यायनिर्णयाद्वारे जो निर्णय दिला आहे तो पुढीलप्रमाणे:

"यासंदर्भात, ( त्यात) महसूल प्रशासनासाठी घातक होतील अशी कृत्ये आणि आदेशांच्या संकल्पनेचा समावेश आहे असे मानलेच पाहिजे. आयकर अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशामध्ये काही गंभीर त्रुटी असणार, ज्यामुळे तत्सम निर्धारणाकरिता एक वाईट कल किंवा स्वरूप स्थापित शकते, ज्याच्या व्यापक गणनेवरून, ती आयुक्तांना महसूल प्रशासनाच्या हितासाठी बाधक वाटू शकते".

आमच्या दृष्टीने ही अर्थउकल स्वीकारण्यासाठी अत्यंत संकुचित आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार, कर आकारणी आणि तो गोळा करणे हे या अधिनियमाचे प्रयोजन आहे आणि सदर काम हे महसूल खात्याकडे सोपविण्यात आले आहे. आयकर अधिकाऱ्याच्या चुकीच्या आदेशामुळे महसूल विभागास एखाद्या व्यक्तीकडून कायदेशीरपणे मिळणाऱ्या देय कराचे नुकसान होत असेल तर तो आदेश निश्चितच महसुलाच्या हितास बाधक असा आहे."

१०. "महसुलाच्या हितासाठी बाधक" हा वाक्प्रचार करनिर्धारण अधिकाऱ्याने दिलेल्या चुकीच्या आदेशासोबत वाचला पाहिजे. करनिर्धारण अधिकाऱ्याच्या आदेशाचा परिणाम म्हणून होणारे महसुलाचे प्रत्येक नुकसान महसुलाचा हितसंबंधासाठी बाधक मानले जाऊ शकत नाही, उदाहरणार्थ, जेव्हा आयकर अधिकारी कायद्याने अनुज्ञेय कार्यवाहींपैकी एका कार्यवाहीचा अवलंब करतो आणि त्यामुळे महसुलाचे नुकसान होते; किंवा जेथे दोन दृष्टिकोन शक्य आहेत आणि आयकर अधिकाऱ्याने एक दृष्टिकोन स्वीकारला आहे ज्याच्याशी आयुक्त सहमत नाहीत, अशा परिस्थितीमध्ये आयकर अधिकाऱ्याने स्वीकारलेला दृष्टिकोन हा जोपर्यंत तो कायद्यानुसार टिकाऊ नसल्याचे सिद्ध होत नाही तोपर्यंत तो महसुलाच्या हिताला बाधक असा चुकीचा आदेश मानला जाऊ शकत नाही. या न्यायालयाने असे निर्णीत केले आहे की, एखाद्या व्यक्तीने न कमावलेली रक्कम त्याच्या हातातील उत्पन्न म्हणून निर्धारित केली जाते तेव्हा त्या रकमेबाबत

करनिर्धारण अधिकाऱ्याने तसे स्वीकारून दिलेला आदेश चुकीचा आणि महसुलाबाबतच्या हितसंबंधांना बाधक असेल. (रामप्यारी देवी सरोगी विरुद्ध सी.आय.टी [(१९६८) ६७ आय.टी.आर. ८४ ( सर्वोच्च न्यायालय)] आणि तारादेवी अग्रवाल विरुद्ध सी.आय.टी [(१९७३) ३ एस्. सी. सी. ४८२ :१९७३ सु.को.के. ( कर) ३१८: (१९७३) ८८ आय.टी.आर. ३२३] मधील न्यायनिर्णय वाचा)"

७.२) अशाप्रकारे, मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित (उपरोल्लेखित) या प्रकरणांमध्ये या न्यायालयाने परिच्छेद क्रमांक ९ मध्ये असे निरीक्षण नोंदविले आहे की सदर अधिनियमाचे प्रयोजन हे अधिनियमाच्या तरतुदीनुसार कर आकारणे आणि गोळा करणे हे आहे आणि हे काम महसूल विभागाकडे सोपविले आहे. पुढे असे निरीक्षण नोंदविले आहे की आयकर अधिकाऱ्याच्या चुकीच्या आदेशामुळे, जर एखाद्या व्यक्तीकडून कायदेशीररित्या देय असलेला कर महसूल खाते गमावत असेल, तर ते निश्चितपणे महसुलाच्या हितासाठी बाधक असेल. तथापि, केवळ अशा प्रकरणांमध्ये जेथे दोन दृष्टिकोन शक्य आहेत आणि करनिर्धारण अधिकाऱ्याने एक दृष्टिकोन स्वीकारला, तर असा निर्णय, जो वाजवी असू शकतो आणि त्यामुळे महसुलाचे नुकसान झाले असेल, अशा प्रकारच्या आदेशामध्ये कलम २६३ नुसार पुनरीक्षण करता येणार नाही.

७.३) मलबार इंडस्ट्रियल कंपनी मर्यादित(उपरोल्लेखित) प्रकरणामध्ये या न्यायालयाने घालून दिलेला कायदा हा प्रस्तुत खटल्यातील वस्तुस्थितीवर लागू केला असता आणि आयुक्तांनी नोंदविलेल्या निरीक्षणानुसारदेखील, कर निर्धारण अधिकाऱ्यांनी दिलेला आदेश चुकीचा आहे तसेच महसूल हितासाठी बाधक आहे. करनिर्धारण आदेश तसेच आयकर आयुक्तांनी दिलेल्या आदेशाचे वाचन केल्यानंतर आम्ही असे मत व्यक्त करतो की निर्धारण आदेश केवळ चुकीचाच नाही तर महसुलाच्या हितासाठी देखील बाधक होता. प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेता असे म्हणता येणार नाही की आयुक्तानी कलम २६३ मध्ये न प्रदान केलेल्या अधिकारीतेचा वापर केला आहे. चुकीच्या करनिर्धारण आदेशामुळे कराच्या रूपात महसुलाचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये आणि प्रकरणातील वर नमूद केलेली तथ्ये आणि परिस्थिती विचारात घेता उच्च न्यायालयाने आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अन्वये अधिकारीतेचा वापर करून आयुक्तांनी दिलेला आदेश रद्द करण्याची अत्यंत गंभीर चूक केली आहे.

८. वर नमूद केलेला दृष्टिकोन आणि वर नमूद केलेल्या कारणांमुळे, प्रस्तुतचे अपील यशस्वी होते. उच्च न्यायालयाने दिलेला आक्षेपित न्यायनिर्णय आणि आदेश याद्वारे रद्द करून बाजूला टाकण्यात आला आहे आणि आयकर अधिनियमाच्या कलम २६३ अंतर्गत अधिकारीतेचा वापर करून आयुक्तांनी दिलेला आदेश याद्वारे पुनःस्थापित करण्यात आला आहे.

परिणामी, प्रस्तुत अपील मान्य करण्यात आले आहे.  तथापि, खटल्यातील तथ्य आणि परिस्थिती विचारात घेऊन खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x